Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# ग्रंथालये आणि समाज: विशेष संदर्भ आदिवासी समाज

**श्री. नारायण ज्ञानोबा फड**
ग्रंथपाल, शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार
वाणिज्य महाविद्यालय, शिवळे, ता- मुरबाड, जिल्हा- ठाणे.
मोबाईल नं 8879807179
Mail ID: ndphadlibn1995@gmail.com

**प्रस्तावना:**

भारत हा विविधतेने नटलेला देश असून येथे अनेक आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. आदिवासी समाज हा देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मात्र, ऐतिहासिक, भौगोलिक, शैक्षणिक व आर्थिक कारणांमुळे आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून काहीसा दूर राहिला आहे. आधुनिक काळात आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि माहिती यांचा समन्वय आवश्यक आहे. या सर्व घटकांमध्ये ग्रंथालय ही एक प्रभावी सामाजिक संस्था म्हणून आदिवासी समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**उद्देश:**

ग्रंथालये आणि समाज : विशेष संदर्भ आदिवासी समाज या शीर्षकाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी पुढील उद्येश निश्चित करण्यात आलेले आहेत.

१)आदिवासी समाज आणि त्यांची संस्कृती याची माहिती उधृत करणे.
२)आदिवासी समाजाच्या विकासामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची भूमिका अजमावणे.
३)सार्वजनिक ग्रंथालय स्थिती, भूमिका आणि आधुनिक युग याचा परामर्श घेणे.
४)आदिवासी समाजासाठी ग्रंथालयांची आवश्यकता कारणमीमांसा शोधणे,

**आदिवासी समाजाची संकल्पना:**

जंगल, डोंगराळ भागात राहणारा, निसर्गाशी नाते जपणारा, स्वतःची स्वतंत्र भाषा, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती असलेला समाज म्हणजे आदिवासी समाज. भारतात भिल्ल, गोंड, वारली, कोळी, कातकरी, ठाकूर, कोरकू, माडिया गोंड अशा अनेक जमाती आढळतात. या समाजाची जीवनशैली साधी असून परंपरागत ज्ञान, लोककला, लोकसाहित्य व नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित उपजीविका हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

**आदिवासी समाजाच्या विकासाची गरज:**

स्वातंत्र्यानंतरही आदिवासी समाज अनेक समस्यांना सामोरा जात आहे. अशिक्षण, दारिद्र्य, आरोग्याच्या समस्या, बेरोजगारी, अंधश्रद्धा, माहितीचा अभाव आणि आधुनिक तंत्रज्ञानापासून दूर राहणे ही प्रमुख आव्हाने आहेत. त्यामुळे आदिवासी समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास करणे ही काळाची गरज बनली आहे. या विकास प्रक्रियेत ग्रंथालय महत्त्वाचे साधन ठरू शकते.

**ग्रंथालय - संकल्पना:**

ग्रंथालय म्हणजे केवळ पुस्तकांचा संग्रह नसून ते ज्ञान, माहिती, विचार आणि वाचन संस्कार यांचे केंद्र आहे. ग्रंथालय वाचकांना वाचनाची सवय लावते, विचारशक्ती विकसित करते आणि व्यक्तिमत्त्व घडवते. समाजातील सर्व घटकांपर्यंत ज्ञान पोहोचविण्याचे कार्य ग्रंथालय करते. त्यामुळे ग्रंथालय हे लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम मानले जाते.

**ग्रंथालयाचे महत्त्व:**

१) शिक्षण आणि साक्षरता: हे सर्वांसाठी शिक्षण, माहिती आणि ज्ञान उपलब्ध करून देते, ज्यामुळे लोकांची विचारशक्ती वाढते.

२) माहिती साक्षरता: ग्रंथालये लोकांना योग्य आणि विश्वसनीय माहिती कशी शोधावी हे शिकवतात.

३) संशोधनाला प्रोत्साहन: संशोधन आणि नवीन कल्पनांना चालना देण्यासाठी आवश्यक साधने पुरवतात.

४) सांस्कृतिक जतन: मानावाचे एका पिढीचे ज्ञान, संस्कृती ग्रंथस्वरुपात जतन करून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचवण्याचे काम ग्रंथालये पुरातन काळापासून करत आहेत.

५) समुदायाचा विकास: हे एक शांत आणि सकारात्मक वातावरण देते जिथे लोक शिकू शकतात आणि संवाद साधू शकतात, तसेच ते समाजातील सर्व स्तरातील लोकांना माहितीचे समान अधिकार देते.

५) डिजिटल युगातील प्रासंगिकता: तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालये बदलत्या काळासोबत जुळवून घेत आहेत आणि माहितीच्या युगात त्यांची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे.

**आदिवासी समाज विकासात ग्रंथालयाची भूमिका:**

**१) शैक्षणिक विकास:**

आदिवासी भागातील शाळा, वसतिगृहे आणि गावांगावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना झाल्यास विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यास मदत होईल. अभ्यासपूरक पुस्तके, संदर्भग्रंथ, बालसाहित्य उपलब्ध झाल्यामुळे गळतीचे प्रमाण कमी होऊन शैक्षणिक प्रगती साधता येईल.

**२) माहिती व जनजागृती:**

शासकीय योजना, आरोग्य, स्वच्छता, पोषण, शेती, वनहक्क कायदा, पेसा कायदा यासंबंधी माहिती ग्रंथालयातून उपलब्ध झाल्यास आदिवासी समाज अधिक जागरूक बनतो. माहितीच्या अभावामुळे होणारे शोषण थांबविण्यास ग्रंथालय मदत करते.

**३) सांस्कृतिक जतन व संवर्धन**:

आदिवासी लोककथा, लोकगीते, लोकनृत्ये, परंपरा आणि भाषा यांचे दस्तऐवजीकरण ग्रंथालयात करता येते. यामुळे आदिवासी संस्कृतीचे जतन होते आणि पुढील पिढ्यांना आपल्या वारशाची ओळख मिळते.

**४) व्यक्तिमत्त्व विकास:**

ग्रंथालयातून आत्मचरित्रे, प्रेरणादायी पुस्तके, नियतकालिके व वृत्तपत्रे वाचल्याने आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि विचारस्वातंत्र्य विकसित होते. यामुळे आदिवासी युवक समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास सक्षम होतील.

**५) डिजिटल व आधुनिक ज्ञानाची ओळख:**

डिजिटल ग्रंथालय, ई-बुक्स, इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिल्यास आदिवासी समाज आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडला जातो. स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास व रोजगाराच्या संधींबाबत माहिती मिळते.

**आदिवासी भागातील ग्रंथालयांसमोरील आव्हाने:**

आदिवासी भागात ग्रंथालयांच्या विकासास काही अडथळे आहेत. ती पुढील प्रमाणे...

- **आदिवासी समाज मुख्यत:** जंगल, डोंगराळ, दुर्गम भागात राहतो. त्यामुळे शासकीय सेवा पोहोचवणे कठीण होते. दुर्गमतेमुळे डोंगराळ भागात ग्रंथालय बांधणे आणि चालवणे कठीण आहे.
- मुख्य प्रवाहातील समाजाशी संवाद कमी असल्यामुळे माहिती, आरोग्य, रोजगार याबाबत अज्ञान असते.
- **निधीची कमतरता**: स्थानिक प्रशासनाकडे पुरेसा निधी नसतो, त्यामुळे ग्रंथालये उपेक्षित राहतात.
- **भाषिक अडथळे**: मराठी, हिंदी किंवा इंग्रजी साहित्य आदिवासी भाषिकांसाठी उपयुक्त ठरत नाही.
- **तांत्रिक मर्यादा**: इंटरनेट, संगणक, वीज यांची अनुपलब्धता डिजिटल ग्रंथालयांसाठी अडथळा ठरते.
- **सामाजिक अनास्था**: काही ठिकाणी वाचनाची परंपरा नसल्यामुळे ग्रंथालयाचा वापर कमी होतो म्हणूनच स्थानिक समाजाची वाचनाबाबतची अनास्था हे एक आव्हान आहे.
- आर्थिक साधनांची कमतरता, प्रशिक्षित ग्रंथपालांचा अभाव, वाचनसंस्कृतीचा अभाव.

**उपाययोजना:**

१) प्रत्येक आदिवासी गावात लघुग्रंथालय स्थापन करणे.
२) स्थानिक भाषेतील व सोप्या भाषेतील पुस्तके उपलब्ध करणे.
३) फिरते ग्रंथालय व वाचन मोहिमा राबवणे.
४) शाळा व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ग्रंथालयाचा वापर वाढवणे.
५) डिजिटल व मोबाईल ग्रंथालय संकल्पना राबवणे.
६) वाचनासाठी प्रवृत्त करून वाचन संस्कृती रुजवणे.

**सार्वजनिक ग्रंथालय स्थिती, भूमिका आणि आधुनिक युग:**

सार्वजनिक ग्रंथालय हा प्रत्येक राज्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारा महत्त्वाचा घटक आहे. सार्वजनिक ग्रंथालय अधिनियमाचे प्रमुख उद्दिष्ट त्यांच्या सदृढ पायाचा विकास करणे हेच असते. साहित्यिकांनी निर्मिती केलेला ग्रंथ मुद्रणानंतर वाचकांकरिता उपलब्ध होतो. परंतु आपल्या नागरिकांची क्रयशक्ती आणि त्याची गरज लक्षात घेतली तर प्रत्येक नागरिक ग्रंथ खरेदी करू शकतोच असे नाही. त्यामुळे वाचकांची गरज व आवड जोपासण्याचे कामाकरिता सार्वजनिक ग्रंथालय मदत करू शकतात. ग्रंथ चळवळीतील साहित्यिक या घटकाला व त्यांच्या संस्थेला महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियमाने राज्य ग्रंथालय परिषद, ग्रंथ निवड समिती आणि ग्रंथोत्सव समिती यावर योग्य ते प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांनी वाचक आणि साहित्यिक यांच्यात समावेश व सौहार्द घडऊन आणण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतल्याची उदाहरणे आहेत. सार्वजनिक ग्रंथालय शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातूनही वाचकांपर्यंत साहित्यिक आणि त्यांचे साहित्य आणि त्यांच्याशी संवाद घडविण्याचे काम करतात. तथापि ग्रंथ चळवळीतील साहित्यिक मंडळी, सार्वजनिक ग्रंथालय आणि वाचकांच्या मागण्यांबाबत किती प्रमाणात जागृत आहेत हा खरा प्रश्न आहे. साहित्यिक आणि साहित्य संस्थांची ही उदासीनता ग्रंथालय चळवळीच्या विकासाकरिता मारक ठरते.

आपल्या राज्यात जाणीवपूर्वक व्यवसाय करणारा प्रकाशक आहे. तसेच केवळ पैसा मिळवायचा म्हणून कोणताही विधी- निषेध न बाळगता धंदा करणारा प्रकाशकही आहे. सोबतच स्वतःचा ग्रंथ स्वतः प्रकाशित करणारी मंडळी ही आहेत. प्रकाशन व्यवसाय जास्त प्रमाणात पुणे, मुंबई परिसरात एकवटलेला आहे. राज्यात ललित व ललितेतर साहित्य विक्रीची व्यवस्था विभागीय मुख्यालय आणि जिल्ह्यांवरती मर्यादित आहे. त्यामुळे प्रकाशकांना वितरणाकरिता योग्य अशी यंत्रणा राज्यात उपलब्ध नाही. प्रकाशक आणि वितरक अशी साखळी आपल्याकडे निर्माण होऊ शकली नाही. प्रकाशक सरळ विक्री करू लागल्यामुळे त्यांचे लक्ष पाठ्यपुस्तके, वह्या ,लेखनसामग्री याकडे वळलेले आहे.

पुस्तक खरेदीवर द्यावी लागणारी सूट ही नवीन समस्या निर्माण झाली आहे. केंद्रीय सूट पद्धतीमुळे स्थानिक पातळीवर ग्रंथविक्री करणाऱ्या छोट्या ग्रंथ विक्रेत्यांवर त्यांचा व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे. प्रथित यश, प्रकाशक त्यांच्या प्रकाशनावर देत असलेली व्यापारी सूट, वाहतूक खर्च वजा जाता फारच कमी आहे. त्यामानाने शासन निर्धारित केलेली सूट जास्त असल्यामुळे छोट्या ग्रंथविक्रेत्यांची गोची झाली आहे.

भारतातील लोकसंख्येचा विचार करता भारत हा तरुणांचा देश आहे असे आपण मानतो. सामान्यपणे आजची तरुण पिढी वाचत नाही अशी तक्रार केली जाते. तरुणांचा ओढा वाचनीय साहित्यापेक्षा डिजिटल साहित्य वाचनाकडे जास्त आहे. इंटरनेट आणि गुगल यासारख्या माध्यमांमुळे 'पूरी दुनिया मेरी मुठ्ठी मे' असा तरुण पिढीचा गोड समज झाला आहे. ते माहिती आणि ज्ञान यामध्ये फार मोठी गलती करीत आहेत.आजच्या तरुणांना सर्व तात्काळ इन्स्टंट पाहिजे. त्यांच्या जगण्याचा संघर्षही वेगळा आहे. त्यांच्या जीवन संघर्षात चांगले ग्रंथ आणि वाचनीय साहित्य मदत करू शकतात. हे त्यांच्या निदर्शनास आणण्याची गरज आहे. त्यांची छापील सोबतच डिजिटल साहित्याची मागणी पुरविण्याकरिता सार्वजनिक ग्रंथालयांना सक्षम व्हावे लागेल. आजच्या तरुणांना ललित साहित्यापेक्षा वास्तवावर आधारित साहित्य, स्पर्धा परीक्षकांना उपयोगी पडणारे साहित्य, दैनंदिन उपयोगाकरिता आणि व्यवस्थापनाकरिता मार्गदर्शन करणारे साहित्य लागते. त्यामुळे जुने लेखक आणि त्यांचे अभिजात साहित्य यांचे वाचन करणारी पिढी दुर्मिळ होत चालली आहे. जुन्या वाचकांना नवीन साहित्यापेक्षा अनुवादित साहित्य जास्त प्रिय असल्याचे दिसून येते. त्यामुळे साहित्यिकांनी वाचकांना काय पाहिजे याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. वृत्तपत्रातील ग्रंथांच्या परीक्षणांमध्ये विविधता दिसून येत नाही. मराठी ग्रंथ परीक्षणाच्या संदर्भात ही बाब जास्त मोठ्या प्रमाणात जाणवते. हेही तितकेच सत्य आहे.

वाचन संस्कृती वाढीच्या अनुषंगाने विचार केला तर मुद्रित माध्यमे, ग्रंथ, वृत्तपत्र, नियतकालिके यांना पर्याय नाह. हे सिद्ध झाले आहे. डिजिटल वाचनाच्या काही मर्यादा आहेत. तरीही डिजिटल साधनांचा वापर ग्रंथालयांना करावाच लागेल. वाचन संस्कृती शब्दप्रयोग करताना वाचनाची सवय रुजली आहे का? हे पाहणे महत्त्वाचे आहे. वाचकांची संख्या का वाढत नाही. यासाठी आपण वाचक घडविण्यासाठी शालेय स्तरापासून किती प्रयत्न करतो आहोत, याचा विचार करण्याची गरज आहे. त्यासाठी केवळ सार्वजनिक ग्रंथालयांनाच दोष देऊन चालणार नाही. वाचनाची गोडी जोपासली जावी याकरिता बालवयापासून वाचन संस्कार करावे लागतील. त्यासाठी प्रत्येक शाळेत ग्रंथालय असलेच पाहिजे. आणि शाळेतील अभ्यासक्रमाचा भाग म्हणून ग्रंथ वाचनाचा दररोज एक तास ठेवला पाहिजे. आपली परीक्षा पद्धती ग्रंथालयाभिमुख केली पाहिजे. तसेच रोजगार विनिमय केंद्रात जेथे साक्षरतेची आवश्यकता आहे. अशा ठिकाणी रोजगारासाठी नाव नोंदणी करणाऱ्या बेरोजगाराला सार्वजनिक ग्रंथालयांचे सदस्यत्व घेतल्या बाबतचे प्रमाणपत्र सादर करणे. असे निर्णय जाणीवपूर्वक घेतले पाहिजेत.

वाचकांसाठी करावयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमात कीर्तन, प्रवचन, काव्यवाचन, काव्य गायन, श्रेष्ठ व्यक्तींची जयंती किंवा पुण्यतिथी नाट्य अभिनय, कथाकथन, ग्रंथ प्रदर्शन, व्याख्यान, समूह चर्चासत्र, वाचन शिबीर यांचा सार्वजनिक ग्रंथालयांनी समावेश करून नागरिकांशी

संवाद वाढविला पाहिजे. या कार्यक्रमाची वाचन स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा यासारखे उपक्रम राबवून गावातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले पाहिजे. सर्व वयोगटातील विशेषतः बालवाचक ग्रंथालय याकरिता प्रवृत्त होतील. अशा उपक्रमांची आखणी केली गेली पाहिजे.

वाचनीय साहित्य आणि ग्रंथ यांचा संग्रह असलेले 'आलय' ही संकल्पना कालबाह्य झाली आहे. पूर्वापार चालत आलेली ग्रंथ संरक्षणाची भूमिका बदलून ग्रंथांचा वापर आणि त्यावर आधारित माहिती सेवा यावर आजच्या काळात विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे. आज नागरिकांच्या सर्व प्रकारच्या माहितीची गरज आणि सेवा ती सेवा पुरविण्याचे प्रभावी साधन म्हणून सार्वजनिक ग्रंथालयांकडे पाहिले जाते. ग्रंथपाल व ग्रंथालय यांच्या कामकाजामध्ये माहिती तंत्रज्ञानामुळे अमुलाग्र बदल होत आहेत. संगणक आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून सार्वजनिक ग्रंथालयांनी आपल्या कामकाजात बदल करून वाचकांपर्यंत गेले पाहिजे. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची संख्यात्मक वाढ याचेच दोत्तक आहे. सार्वजनिक ग्रंथालयांची संख्यात्मक वाढ आणि गुणवत्ता यात समतोल साधला जाणे गरजेचे आहे. भारतात सुमारे ६०,००० सार्वजनिक ग्रंथालय आहेत. त्यापैकी २० टक्के ग्रंथालये महाराष्ट्रात आहेत.

सार्वजनिक ग्रंथालयांचे कार्यकर्ते व कर्मचारी आणि ग्रंथालय संचालनालय यांनी " ग्रंथालये ही वाचकांच्या सेवेसाठी असून त्यांना चांगली ग्रंथसेवा देणे हे आपले कर्तव्य आहे." या भावनेने काम केले पाहिजे. लोकप्रतिनिधी, शासकीय व शासकीय अधिकारी, प्रतिष्ठित व ज्येष्ठ नागरिक यांच्याशी संपर्क साधून त्यांना सार्वजनिक ग्रंथालय चालणाऱ्या कामाबाबत माहिती देऊन, ग्रंथालय सेवा लोकाभिमुख करण्याची गरज आहे.

सार्वजनिक ग्रंथालयांनी परंपरागत ग्रंथ, देवघेव व वाचन कक्ष सेवा या चौकटीतून बाहेर पडून स्पर्धा परीक्षा करिता मदत करणे, इंटरनेट, ईमेल सेवेच्या मदतीने कृषी मूल्य, बाजारभाव, रेल्वे, बस, विमान, वेळापत्रक आणि आरक्षण, आरोग्य सेवा यासारखी माहिती देणे असे उपक्रम राबविले पाहिजेत.गावातील पर्यटन व ऐतिहासिक स्थळांबाबतची माहिती गावातील लेखक लोकनेते यांची माहिती परिसरातील उद्योगांची माहिती यासारख्या माहितीचे संकलन केले पाहिजे. सार्वजनिक ग्रंथालयांच्या फायद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मुद्रीत वाचनीय साहित्याची उपलब्ध अनौपचारिकता, शिक्षणासाठी समाजविकासाठी माहितीचे प्रदान, माहिती संप्रेषण, तंत्रज्ञान, साक्षरता यांचा समावेश होतो. याची जाणीव ठेवून काम करण्याची गरज आहे.

एकविसाव्या शतकाच्या आजच्या काळात सार्वजनिक ग्रंथालयांची सध्याची अवस्था "बाप जेवू घालीना आणि आई भिक मागू देईना" अशी झाली आहे. रोजगार हमी मजुरा पेक्षाही कमी

वेतनात काम करणारे कर्मचारी. पुरेशा आणि नियमित अनुदानाभावी चालवावी लागणारी ग्रंथालये, वाचकांच्या वाढत्या अपेक्षा, तरुणाईला पाहिजे असलेले संदर्भ व स्पर्धा परीक्षांसाठी लागणारे ग्रंथ, या सर्व पातळीवर लढताना ग्रंथालय चळवळीची आर्थिक व्यवस्थापन स्तरावर दमछाक होत आहे. आपल्या राज्याच्या विविध प्रदेशातील भौगोलिक परिस्थिती, शैक्षणिक विकासाचा स्तर, साक्षरतेचे प्रमाण, यामधील विविधता लक्षात घेऊन सार्वजनिक ग्रंथालय धोरण तयार केले पाहिजे. राज्यकर्ते आणि राज्यातील निर्णय घेणाऱ्या घटकाला राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय विकासाची दिशा कोणती असावी हे स्पष्ट व्हावे याकरिता अशा धोरणाची आवश्यकता आहे. सार्वजनिक ग्रंथालय धोरण नसल्यामुळे राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीचा आजपर्यंत एकसंघ विकास होऊ शकला नाही. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवेचा लाभ हा सर्व नागरिकांपर्यंत पोहोचावा यासाठी 'गाव तेथे ग्रंथालय' विशिष्ट कालावधीत पूर्ण व्हावे असे नियोजन केले पाहिजे. किमान एक गाव, एक ग्रंथालय असे धोरण प्राथमिक गरज म्हणून अमलात आणले पाहिजे.

महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा यासाठी राज्यातील वेगवेगळ्या स्तरावरील ग्रंथालयांचे संगणकीकरण आणि आधुनिकीकरण त्यांनी वापरायचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर याबाबत नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी, निश्चित धोरण ठरवून केले पाहिजे. शासन मान्यता आणि अनुदान दिल्यानंतर आपली जबाबदारी संपली अशी भूमिका असणेही योग्य नाही. शासनाच्या सर्व योजना राबविताना आदिवासी, मागास, अल्पसंख्यांक यांच्यासाठी वेगवेगळ्या तरतुदी करण्यात येतात. अशा तरतुदी त्यांच्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, परीक्षण, व्यवस्थापन या संदर्भात करण्याची गरज आहे. किमान अशा परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थांना तेथे सार्वजनिक ग्रंथालय सेवा देणे बंधनकारक केले पाहिजे. यासाठी शंभर टक्के अनुदानाची तरतूद केली पाहिजे. महाराष्ट्रातील शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या कामकाजाबाबतचे सध्याचे वातावरण या धोरणाची आवश्यकता स्पष्ट करते आहे आणि हे गरजेचे आहे.

१९९१ मध्ये मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या स्नेहसंमेलनात भाषण करताना य. दी पेंढारकर म्हणतात, "ग्रंथालयांवरून आणि ग्रंथोत्पादनावरून राष्ट्राची सांस्कृतिक पातळी अजमावली जाते." त्या दृष्टीने कृत्यता मानण्यासारखी परिस्थिती आहे का? ही कृत्यत्ता केव्हा माणायची याबद्दलची तीन गमके आहेत. १. बहुसंख्य जनता वाचन प्रेमी असली पाहिजे. २. ग्रंथकारांना ग्रंथोत्पादनावर आपला निधी चालविता आला पाहिजे. ३. ग्रंथ उत्पादन घोषणा म्हणून असले पाहिजे. त्यांचे हे उद्गार आजच्या परिस्थितीत बदलले आहेत का? यांचा सुज्ञांनी विचार करणे गरजेचे आहे. तरच ग्रंथालय चळवळ ही जोमाने उभी राहू शकेल.

**निष्कर्ष:**

वरील विवेचनावरून सार्वजनिक ग्रंथालयांची स्थिती सुधारणे आवश्यक आहे. ग्रंथालयातील कर्मचार्यांना व्यास्थित वेतन मिळणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ग्रंथालय चळवळ शहरी भागापुरती मर्यादित न राहता आदिवासी पाड्यापर्यंत पोहाली पाहिजे. आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर शिक्षण व माहिती लोकांपर्यंत पोहोचणे अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रंथालय ही केवळ ज्ञानाची पेटी नसून ती सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. योग्य नियोजन, स्थानिक गरजांचा विचार आणि लोकसहभाग यांच्या आधारे आदिवासी भागात ग्रंथालयांची चळवळ उभी राहिली, तर आदिवासी समाजाचा शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास निश्चितच वेगाने घडून येईल. राष्ट्राच्या किंवा राज्याच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासात सार्वजनिक ग्रंथालयाची भूमिका महत्त्वाची आहे. निरक्षणांना साक्षर करणे. साक्षरांना सुशिक्षित करणे आणि सुशिक्षितांना सुसंस्कृत करणे, या हेतूनेच सार्वजनिक ग्रंथालय सुरू करण्यात येतात. युनेस्कोच्या सार्वजनिक ग्रंथालय जाहीरनाम्यात मनोरंजन, ज्ञानार्जन आणि समाज प्रबोधन करण्याकरिता सार्वजनिक ग्रंथालयांची आवश्यकता असते. हे स्पष्ट करण्यात आले आहे. आदिवासी समाजात वाचकांचे वाचन, वाचकांची ग्रंथ प्रसारातील भूमिका व ग्रंथवाचक वाढविण्यासाठी पालकांची व शिक्षकांची भूमिका, प्रकाशक, वाचक व लेखक यांचे अनुबंध वाढविण्याचे प्रयत्न खूप विस्ताराने करता येणे गरजेचे आहे. आदिवासी आणि मुख्य प्रवाहातील समाज यांच्यात संवाद निर्माण करण्यासाठी ग्रंथालये निश्चितच उपयुक्त ठरतील यात शंका नाही. भविष्यात आदिवासी समाजासाठी ग्रंथालय चळवळ उभारणे काळाची गरज आहे असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ:**

१) जोशी श्रीपाद भालचंद्र, देशपांडे अजय, संपा. 'मराठी राज्यातले मराठीचे वर्तमान' संपादक, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. पहिली आवृत्ती, २०२२.

२) महाजन शां.ग. ,'वाचन संस्कृती जोपासावी', युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१४.

३) महाजन शां.ग.,'महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीचे शिल्पकार', २०२२.

४) महाजन शां.ग. ,'विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांचे व्यवस्थापन' ,२०१३.

५) महाजन शां. ग. 'ग्रंथ लेखन संपादन',२०१६.